# आयईएस चंद्रकांत पाटकर विद्यालय किंडरगार्टन आणि बालोद्यान

राजाजी पथ, चंद्रकांत पाटकर मार्ग, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१

**२१ एप्रिल २०२१**

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२० -२१ साठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन करण्याच्या मुदतवाढीबाबत बालोद्यान वर्गाच्या पालकांना सूचना.**

प्रिय पालक,

कोविड -१९ या महामारीच्या वाढीमुळे महाराष्ट्रात अनेक निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यामुळे बालोद्यान वर्गाच्या प्रशासनाचे कामकाज रोखले गेले आहे. आम्ही आपल्या मुलाच्या शैक्षणिक प्रगतीच्या मूल्यांकनाचे विश्लेषण आपण शाळेत नोंदणी केलेल्या ई-मेलवर अथवा इ-मेल नसल्यास व्हाट्स अपवर मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात पाठवण्याचे प्रस्तावित करीत आहोत. हे सरकारने जारी केलेल्या पुढील मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन आहे. कार्यालये पुन्हा उघडण्यास प्रतिबंधित करण्यात आल्यास पुन्हा त्याचे परिणाम वेळापत्रकावर होऊ शकतात. कार्यालये पूर्णत: कार्यान्वित झाल्यानंतर प्रगतीची / मूल्यांकनाची प्रत पालकांना देणे शक्य होईल.

यादरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक वर्षासाठी फी थकबाकीदार असणाया पालकांना ०७.०५.२०२१ रोजी किंवा त्याआधी सूचित केलेल्या सर्व शुल्काच्या थकबाकीची पूर्तता करण्याची विनंती केली आहे.

तसेच सर्व पालकांना हे सूचित करण्यात येते की सध्याच्या परिस्थितीत शाळेत प्रवेश करणे शक्य नसल्यामुळे, शाळेचे नाव आणि स्थान असलेल्या सामान्य कागदावर नोटिस लिहून ती शाळेच्या संकेत स्थळावर प्रकाशित आणि अपलोड केली जात आहे.

पालकांना विनंती आहे की पुढील सूचनांसाठी शाळेची वेबसाइट, ईमेल आणि ईमेल नसल्यास व्हॉट्स अप नियमितपणे तपासावे.

**सही/-**

**श्रीमती प्रज्वला कदम**

**मुख्याध्यापिका**

**आयईएस** चंद्रकांत पाटकर विद्यालय
**किंडरगार्टन आणि बालोद्यान**